# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

## अभिवेदन (Representation) क्रमांक ७२ / २०२५

वीज देयक दुरूस्ती व कृषीपंप वीज धोरण २०२० योजनेचा लाभ मिळण्याबाबत

रामगोंडा सिदगोंडा पाटील .................................................................................................. अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, गडहिंग्लज (महावितरण) .............................................. प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- १) रामगोंडा सिदगोंडा पाटील
२) भिमगोंडा सिदगोंडा पाटील

प्रतिवादी तर्फे :- १) सं. कृ. पवार, कार्यकारी अभियंता, गडहिंग्लज
२) राम सुर्यवंशी, उपकार्यकारी अभियंता, गडहिंग्लज

**कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)**

सुनावणी तारीख :- २५ ऑगष्ट २०२५

आदेश पारित दिनांक :- २७ ऑक्टोबर २०२५

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक ३० एप्रिल २०२५ च्या आदेशाविरूध्द

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २९ जुलै २०२५ रोजी दाखल केले. मंचाने दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

*"१) वि.प.कंपनीने तक्रारदार ग्राहकाला सरासरी युनिटप्रमाणे अदा केलेले माहे जून २०१७ ते मार्च २०२४ या विवादित कालावधीतील वीज देयके योग्य प्रकारे दुरुस्त करुन दिल्यामुळे ती आणखी दुरुस्त करण्याची मागणी नामंजूर करण्यात येत आहे.*

*२) वि.प.कंपनीने तक्रारदार ग्राहकास त्यांचे वीज देयकावर नोंद केलेला चुकीचा विद्युत भार सप्टेंबर २०१२ पासून दुरुस्त करुन तो ७.५ अश्वशक्ती करुन देण्यात यावा.*

*३) तक्रारदार ग्राहकाच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहे."*

२. प्रतिवादी यांनी त्यांच्या निवेदनातील व दिनांक २५ ऑगष्ट २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी हे दिनांक १५ जुलै १९७० पासून महावितरणचे कृषी ग्राहक (क्रमांक २५३५१००२८५८४) आहेत. अपिलार्थीच्या वीज जोडणीची माहिती खालील तक्ता क्र.१ मध्ये नमुद केली आहे.

तक्ता क्र.१

| Name of Consumer | Consumer No. | Address | San. Load | Date of Supply |
|---|---|---|---|---|
| Ramgonda Sidgonda Patil | 253510028584 | S N K Road Dist Kolhapur Pin-416502 | 10 HP On CPL | 15.07.1970 |

- अपिलार्थींना त्रैमासीक कृषी वीज देयके देण्यात येतात. अपिलार्थींना मार्च २०१९ त्रैमासीक पर्यंत मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके देण्यात आली. त्यावेळी (मार्च २०१९ त्रैमासीक पर्यंत) अपिलार्थी हे रु.२०,१७५.१६ इतक्या रक्कमेचे थकबाकीदार होते. अपिलार्थींनी १६ मार्च २०१८ रोजी रु.७,५००/- चे वीज देयकाचा भरणा केला. परंतू जून २०१८ ते मार्च २०१९ या कालावधीत वीज देयके मीटर वाचनाप्रमाणे असून सुध्दा वीज देयकांचा भरणा केला नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

➢ अपिलार्थीना खालील तक्ता क्र.२ प्रमाणे सीपीएल नुसार वीज देयके देण्यात आली. तक्त्यावरून असे दिसते की, अपिलार्थीने देयकांचा भरणा जून २०१८ पासून फक्त डोनदा केला आहे. इतर महिन्यात देयके भरली नसल्यामुळे थकबाकी वाढत गेली आहे.

तक्ता क्र.२

| Bill Month | Meter No. | MS1(Meter Status) | Current Reading | Previous Reading | Cons. | Months | Net Arrears | Net Bill Amount | Last Receipt Date | Receipt Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | KWH | KWH | Unit | No. | Rs. | Rs. | | Rs. |
| JUN-16 | 6506357304 | Normal | 8347 | 6532 | 1815 | 3.03 | -1.46 | 2129.07 | 07-May-16 | 2020 |
| SEP-16 | 6506357304 | Normal | 9064 | 8347 | 717 | 3.07 | -87.06 | 705.09 | 18-Aug-16 | 2110 |
| DEC-16 | 6506357304 | Normal | 11093 | 9064 | 2029 | 3.03 | 720.93 | 3115.46 | 18-Aug-16 | 0 |
| MAR-17 | 6506357304 | Normal | 14902 | 11093 | 3809 | 3.8 | -4.54 | 4570.58 | 24-Mar-17 | 3120 |
| JUN-17 | 6506357304 | Normal | 15305 | 14902 | 403 | 2.5 | 4476.48 | 5269.82 | 24-Mar-17 | 0 |
| SEP-17 | 6506357304 | Normal | 15340 | 15305 | 35 | 3.6 | 5272.6 | 5866.35 | 24-Mar-17 | 0 |
| DEC-17 | 6506357304 | Normal | 19840 | 15340 | 4500 | 2.5 | 4450.47 | 13026.29 | 13-Nov-17 | 800 |
| MAR-18 | 6506357304 | Normal | 22044 | 19840 | 2204 | 4.03 | 5125.56 | 7787.7 | 16-Mar-18 | 7500 |
| JUN-18 | 6506357304 | Normal | 22380 | 22044 | 336 | 2.03 | 7125.45 | 8654.24 | 16-Mar-18 | 0 |
| SEP-18 | 6506357304 | Locked | 22380 | 22380 | 1173 | 3 | 7902.32 | 11192.07 | 16-Mar-18 | 0 |
| DEC-18 | 6506357304 | Locked | 22380 | 22380 | 1173 | 3 | 10188.26 | 14523.47 | 16-Mar-18 | 0 |
| MAR-19 | 6506357304 | Normal | 26692 | 22380 | 4312 | 9 | 13028.57 | 20175.16 | 16-Mar-18 | 0 |
| JUN-19 | 6506357304 | Locked | 26692 | 26692 | 2697 | 3 | 18030.46 | 27103.7 | 16-Mar-18 | 0 |
| SEP-19 | 6506357304 | Inaccessible | 26692 | 26692 | 2697 | 3 | 24497.02 | 35035.37 | 16-Mar-18 | 0 |
| DEC-19 | 3903427660 | Inaccessible | 0 | 0 | 6000 | 3 | 31564.34 | 45328.63 | 16-Mar-18 | 0 |
| MAR-20 | 3903427660 | Inaccessible | 0 | 0 | 6000 | 3 | 41010.97 | 52733.9 | 16-Mar-18 | 0 |
| JUN-20 | 3903427660 | Locked | 0 | 0 | 6000 | 3 | 46422.63 | 64347.35 | 16-Mar-18 | 0 |
| SEP-20 | 3903427660 | Locked | 0 | 0 | 6000 | 3 | 56750.13 | 76328.52 | 16-Mar-18 | 0 |
| DEC-20 | 3903427660 | Inaccessible | 0 | 0 | 6000 | 3 | 67077.63 | 89470.35 | 16-Mar-18 | 0 |
| MAR-21 | 3903427660 | Inaccessible | 0 | 0 | 6000 | 3 | 77405.43 | 101906.56 | 16-Mar-18 | 0 |
| JUN-21 | 3903427660 | Faulty | 0 | 0 | 6000 | 3 | 87717.74 | 115178.75 | 16-Mar-18 | 0 |
| SEP-21 | 3903427660 | Faulty | 0 | 0 | 6000 | 3 | 98014.87 | 128434.13 | 16-Mar-18 | 0 |
| DEC-21 | 03903427660 | Faulty | 0 | 0 | 4029 | 3 | 17435.99 | 39375.5 | 26-Nov-21 | 23010 |
| MAR-22 | 03903427660 | Faulty | 0 | 0 | 4029 | 3 | 28036.74 | 47204.67 | 26-Nov-21 | 0 |
| JUN-22 | 03903427660 | Faulty | 0 | 0 | 4029 | 3 | 35453.82 | 56627.07 | 26-Nov-21 | 0 |
| SEP-22 | 03903427660 | Faulty | 0 | 0 | 588 | 3 | 44340.66 | 59822.54 | 26-Nov-21 | 0 |
| DEC-22 | 03903427660 | Faulty | 0 | 0 | 2016 | 3 | 46364 | 66158.98 | 26-Nov-21 | 0 |
| MAR-23 | 05315791710 | Normal | 192 | 0 | 2242 | 3.63 | 22238.67 | 41651.44 | 17-Feb-23 | 15000 |
| JUN-23 | 05315791710 | Normal | 226 | 192 | 34 | 2.37 | 27493.12 | 43599.78 | 17-Feb-23 | 0 |
| SEP-23 | 05315791710 | Faulty | 226 | 226 | 600 | 3 | 28932.13 | 46695.05 | 17-Feb-23 | 0 |
| DEC-23 | 05315791710 | Normal | 4359 | 226 | 4133 | 2.97 | 31447.18 | 55437.08 | 17-Feb-23 | 0 |
| MAR-24 | 05315791710 | Normal | 6193 | 4359 | 1834 | 2.67 | 36019.27 | 56535.39 | 17-Feb-23 | 0 |
| JUN-24 | 05315791710 | Normal | 6764 | 6193 | 571 | 4 | 39818.05 | 60660.82 | 17-Feb-23 | 0 |
| SEP-24 | 05315791710 | Normal | 7064 | 6764 | 300 | 2.77 | 42744.78 | 63654.22 | 17-Feb-23 | 0 |
| DEC-24 | 05315791710 | Normal | 8254 | 7064 | 1190 | 3 | 44819.39 | 69903.75 | 17-Feb-23 | 0 |
| MAR-25 | 05315791710 | Normal | 8650 | 8254 | 396 | 3.23 | 36743.27 | 55307.12 | 17-Feb-23 | 0 |
| JUN-25 | 05315791710 | Locked | 8650 | 8650 | 1221 | 3 | 30639.98 | 52328.98 | 17-Feb-23 | 0 |

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

➢ अपिलार्थींना खालील कालावधीत चुकीची वीज देयके गेली होती ती खालील तक्ता क्र.३ मध्ये नमुद केल्या प्रमाणे दुरुस्त करण्यात आली.

तक्ता क्र.३

| Period | Month | Units billed (Units) | Bill Revised (Units) | Avg/ quarter (Units) | Units Withdrawn (Units) | Bill Revision Date | Bill Revision Proposed |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Jun 2019 to Jun 2021 | 27 | 47393 | 5292 | 588 | 42101 | 23.11.2021 | Bill revised as per actual reading & found in order |
| Sep 2021 to Sep 2021 | 3 | 6000 | 600 | 600 | 5400 | 10.03.2025 | Found in order |
| Dec 2021 to Jun 2022 | 9 | 12087 | 4050 | 1350 | 8037 | 17.02.2023 | **Proposed 600 unts / quarterly** |
| Sep 2022 to Dec 2022 | 6 | 2604 | 1200 | 600 | 1404 | 10.03.2025 | Found in order |
| Mar 2023 to Mar 2023 | 3 | 2242 | 1242 | 1242 | 1000 | 15.03.2024 | **Proposed 600 unts / quarterly** |
| Sep 2023 to Sep 2023 | 3 | 600 | 0 | 0 | 600 | 15.03.2024 | Found in order |
| | | 70926 | 12384 | | 58542 | | |

➢ जून २०१९ ते जून २०२१ या कालावधीतील मीटर क्रं.३९०३४२७६६० वर ५२९२ KWH रिडींग वाचन जून 2021 मध्ये उपलब्ध होते म्हणून त्या कालावधीत मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके दुरुस्त केली आहेत.

➢ प्रतिवादी महावितरणने नमुद केले की, तक्ता क्र.३ नुसार अपिलार्थींच्या तक्रारीनुसार वीज देयके दुरुस्त करून देण्यात आलेली आहेत.

➢ अपिलार्थीस डिसेंबर २०२३ अखेर पर्यंतचे वीज देयक दुरुस्त करून रक्कम रु.३४८३०/- इतके भरण्याचे कळविले, परंतू अपिलार्थीने थकबाकीचे देयक भरलेले नाही. अपिलार्थीचे अंतिम देयक दिनांक १७ फेब्रुवारी २०२३ रोजी रक्कम रु.रु.१५०००/- हफ्त्यामध्ये भरलेली आहे.

➢ अपिलार्थीने कृषीपंप वीज धोरण २०२० योजना परिपत्रक क्रं.११९१ दिनांक १५ जानेवारी २०२१ नुसार चालू वीज देयक व थकबाकी अशी एकुण वीज देयकांचा भरणा दिनांक ३१ मार्च २०२४ अखेर पर्यंत करणे बंधनकारक होते. त्यानंतरच अपिलार्थीला कृषी धोरणा अंर्तगत सवलत प्राप्त होणार होती, परंतू अपिलार्थीने सदरचे वीज देयक कृषीपंप वीज धोरण २०२० परीपत्रकाप्रमाणे भरलेली नाही. यामुळे अपिलार्थीस कृषीपंप वीज धोरण २०२० योजनेचा लाभ देता येत नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- मंचाच्या आदेशाप्रमाणे तसेच महावितरणच्या नियमाप्रमाणे चुकीचा विद्युत भार १० अश्वशक्ती च्या स्थिर आकाराची माहे सप्टेंबर २०१२ ते मार्च २०२५ या कालावधीमधील वीज देयक दुरूस्ती वजा रक्कम रू.-८४२२.५३ माहे मार्च २०२५ च्या वीज देयकात समायोजित करण्यात आली आहे. तसेच मुख्य कार्यालियाकडून डिसेंबर २०२४ पासून विद्युत भार कमी करणे व वाढविणे ची प्रक्रिया थांबवली असून सदर प्रक्रिया पुनःश्च चालू झाल्या नंतर अपिलार्थीचा विद्युत भार ७.५ अश्वशक्ती करणेबाबत कार्यवाही करणेत येईल याबाबत अपिलार्थीस दिनांक २७ मे २०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले.
- सद्यस्थितीत विद्युत भार कमी करणे, वाढविणे पोर्टल कार्यान्वीत झाल्याने दिनांक २९ जुलै २०२५ रोजी विद्युत भार ७.५ अश्वशक्ती एचपी करणेबाबत कार्यवाही केली असता रक्कम रू.४७६४२.९२ भरावे असा संदेश प्रणालीने दिला आहे. महावितरणने याबाबत अपिलार्थीस थकबाकी भरण्याबाबत कळविले आहे. त्यानतर प्रणाली विश्लेषक, कोल्हापूर यांच्यासोबत समन्वय साधुन दिनांक ८ ऑगष्ट २०२५ रोजी सदरचा विद्युत भार ७.५ अश्वशक्ती करण्यात आला.
- प्रतिवादी महावितरणने मंचाच्या आदेशाच्या पालन केले असून अपिलार्थीचे अभिवेदन रद्द करण्यात यावे हि विनंती.

३. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक २५ ऑगष्ट २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी हे दिनांक १५ जुलै १९७० पासून महावितरणचे कृषी ग्राहक (क्रमांक २५३५१००२८५८४) आहेत. अपिलार्थी यांनी नमुद केले की मंजूर भार २० अश्वशक्ती दिनांक १५ जुलै १९७० पासून चालू होता (ग्राहक क्रमांक २५३५१००२८५८४). सन २००६ मध्ये सदर मोटर पंपावरील सिंचन क्षेत्र कमी झाल्यामुळे २० अश्वशक्ती ऐवजी ७.५ अश्वशक्ती वीज भाराची मंजूरी मिळवून दिनांक २७ मार्च २००६ पासून ७.५ अश्वशक्ती प्रमाणे ऑगष्ट २०१२ पर्यंत वीज देयके येत होती. परंतू सप्टेंबर २०१२ पासून १० अश्वशक्ती मंजूर भाराची वीज देयक येत होती ती चुकीची आहेत. अपिलार्थींना सप्टेंबर २०१२ पासून ७.५ अश्वशक्ती प्रमाणे वीज देयके देण्यात यावी.
- जून २०१९ मधील महापूरामध्ये सदर विद्युत मीटर (क्र.६५०६३३५७३०४) बुडाल्याने महावितरणने ऑक्टोबर २०१९ मध्ये नवीन मीटर (क्रं.३९०३४२७६६०) बदलून दिला. तथापि, वीज देयके

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

"इनॲसेसबल" सदराखाली सरासरी ६००० युनीट त्रैमासीक याप्रमाणे तक्ता क्रं.२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे येत होती, ती चुकीची होती.

- महावितरणने कृषीपंप वीज धोरण 2020 योजने अंर्तगत सप्टेंबर 2020 पर्यत थकबाकीच्या ५0% सुट मिळविण्यासाठी उर्वरित रू.३२,६८0/- व सप्टेंबर 2020 पासूनची चालू वीज देयके रक्कम रू.२०,६६५/- अशी एकत्रितपणे मार्च २०२२ पुर्वी भरण्याबाबत दिनांक २२ फेब्रवारी २०२२ च्या नोटीशीने कळविण्यात आले होते. परंतू सदर वीज देयके महावितरणने मीटर रिडींगनुसार न देता मीटर नादुरूस्त या सदराखाली अंदाजे सरासरी वीज देयके सप्टेंबर २०१९ पासून सप्टेंबर २०२१ पर्यंत आकारली होती. सदर वीज देयके महावितरणने दुरूस्त करून सुधारीत रक्कम रू.२३,०१०/- दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी महावितरणने भरणा करून अपिलार्थीने कृषीपंप वीज धोरण 2020 योजनेत सहभाग नोंदविला होता.
- जून २०२१ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत तक्रार करून सुध्दा अपिलार्थीस मीटर रिडींग प्रमाने वीज देयके न देता पुन्हा सरासरी प्रमाणे वीज देयके अदा केली. तसेच सप्टेंबर २०२१ पर्यंत दुरूस्तीनंतर पुर्ण रक्कम भरले असतानाही पुन्हा मागील थकबाकी आकारणी करून वीज देयके देण्यात आली. तसेच सदर थकबाकीसाठी फेब्रुवारी २०२३ मध्ये वीज पुरवठा खंडीत करण्यात आला म्हणून महावितरणकडे रू.१५०००/- इतकी रक्कम भरून दिनांक १७ फेब्रुवारी २०२३ रोजी वीज पुरवठा पुर्ववत करून देण्यास आला. त्यानंतर दिनांक २० फेब्रुवारी २०२३ रोजी सदर मीटर बदलण्यात आला.
- अपिलार्थीने महावितरणकडे दिनांक २७ फेब्रुवारी २०२३, ८ मार्च २०२३, ५ ऑक्टोबर २०२३ व ६ मे २०२४ रोजी वीज देयके दुरूस्त करून देण्याबाबत अर्ज करूनही वीज देयके दुरूस्त करून देण्यात आले नाही. त्यानंतर दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी च्या अर्जानुसार डिसेंबर २०२४ चे वीज देयक दुरूस्त करून देण्यात आले.
- वीज देयक दुरूस्ती अहवाल व दुरूस्ती रिपोर्ट पाहता डिसेंबर २०२१ ते जून २०२२ ची वीज देयके ही १३५० युनीट / तिमाही प्रमाणे केलेली आहेत. तसेच पुन्हा पुढील सप्टेंबर २०२२ ते डिसेंबर २०२२ ची वीज देयके पुन्हा ६०० युनीट / तिमाही वापराप्रमाणे दिलेली आहेत. **अपिलार्थीचा सरासरी वीज वापर हा ६०० युनीट / तिमाही इतकाच आहे.** तसेच मार्च २०२३ त्रैमासीक या कालावधीत वापर फक्त ६०० युनीट / तिमाही इतकाच होता. तथापि, महावितरणने १२४२ युनीट / तिमाही याप्रमाणे फक्त वीज देयक दुरूस्ती करून दिली आहे, सदर बाब अन्यायकारक आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- अपिलार्थीने महावितरणकडे माहिती अधिकार २००५ अंतर्गत मागितलेल्या अर्जास महावितरणने दिलेल्या उत्तरात सप्टेंबर २०20 ते सप्टेंबर २०२१ ची चालू बाकी यामध्ये विसंगती दिसून येते.
- अपिलार्थीने अभिवेदनात खालीलप्रमाणे मागण्या केलेल्या आहेत.
  - सप्टेंबर २०२१ महिन्याचे रु.२३०१०/- चे भरलेले वीज देयक सप्टेंबर २०20 ची थकबाकी रु.१८,४६२/- ही यामध्ये सामील असून सदर वीज देयक हे दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी भरलेले असून ते दिनांक १८ डिसेंबर २०२० ते ३१ मार्च २०२२ च्या आत भरलेले असलेने कृषीपंप वीज धोरण २०२० योजने अंतर्गत अपिलार्थीस त्यातील ५०% म्हणजे रु.९२३१/- ची सुट मिळावी.
  - दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी महावितरणकडे केलेल्या अर्जानुसार डिसेंबर २०२४ महिन्याचे वीज देयक दुरुस्त करून देण्यात आले. परंतू सद्या मीटर रिडींग नुसार मागील सर्व वीज देयके दुरुस्ती करून देण्यात यावीत.
  - १३५० युनीट / तिमाही वापराप्रमाणे दिली आहेत ती वीज देयके ही ६०० युनीट / तिमाही वापराप्रमाणे देण्यात यावी.
  - अपिलार्थीचा कृषी वीज जोडणी ही ७.५ अश्वशक्ती ची असून शासनाने त्याचे वीज देयक एप्रिल २०२४ पासून माफ केलेले असल्याने ती मार्च २०२४ पर्यंतच देण्यात यावी.

**विश्लेषण व निर्णय**

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. वरील प्रकरणाचा अभ्यास केला असता निदर्शनास येते की, अपिलार्थीहे महावितरणचे कृषी ग्राहक आहेत. अपिलार्थी ग्राहकांना देण्यात आलेली वीज देयके सीपीएल प्रमाणे तक्ता क्रं. २ मध्ये नमुद केले आहे. असे दिसते की जून २०१८ पर्यंत अपिलार्थीना मीटर वाचनाप्रमाणे वीज दयके देण्यात आलेली आहेत. सप्टेंबर २०१८ व डिसेंबर २०१८ या दोन त्रैमासीक कालावधीत १४३७ युनीट प्रती त्रैमासीक अशी वीज देयके देण्यात आली होती. मार्च २०१९ या महिन्यामध्ये ४३१२ युनीट हे एकूण ९ महिन्यासाठी (पुर्वीच्या ६ महिन्याचे समायोजीत करून) प्रणालीतर्फे योग्य प्रकारे देण्यात आले आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

६. जून २०१९ ते मार्च २०२१ या कालावधीत अपिलार्थींना सरासरी वीज देयके देण्यात आली व जून २०२१ मध्ये "फॉल्टी" स्टेटस खाली ६000 युनीट त्रैमासीक अशी वीज देयके देण्यात आली. अपिलार्थीने या कालावधीत त्यावेळी असलेल्या मीटरवर ५२९२ KWH प्रत्यक्ष रिडींग उपलब्ध झाले असल्यामुळे वीज देयके त्याप्रमाणे महावितरणने दुरूस्त करून दिली ती वीज देयके दुरुस्ती योग्य आहे. तक्ता क्रं.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मंचाच्या आदेशाप्रमाणे करण्यात आलेले आहेत. वरील तक्याचा बारकाईने अभ्यास केला असता, डिसेंबर २०२१ ते जून २०२२ या कालावधीत १३५० युनीट प्रती त्रैमासीक याप्रमाणे वीज देयके दुरूस्त केली आहेत. सर्व वस्तूस्थितीचा आढावा घेता या कालावधीत ती ६०० युनीट प्रती त्रैमासीक करणे आवश्यक आहे.

८. महावितरणने दिनांक १५ जानेवारी २०२१ कृषी धोरणचे परिपत्रक पारीत केले (संदर्भ :- शासन निर्णय क्रं.संकींण-2020 प्र.क्र.१२१/उर्जा-५. दि.१८.१२.2020). वीज देयक भरणाबाबतचा अटी या संगणक प्रणालीमार्फत शासनाचे आदेशानुसार सॉफ्टवेअर प्रोग्रामद्वारे अंमलात आणली होती, ती अंमलबजावणीचा कालावधी २०२१-२२ नंतर बंद करण्यात आली, त्यामुळे सद्य परिस्थितीत अपिलार्थी त्या योजनेस पात्र नाही.

९. महावितरणने अपिलार्थीचा वीज भार ७.५ अश्वशक्ती असल्याचे मान्य केले आहे. मंचाने त्यांच्या आदेशात अतिशय बारकाईने अभ्यास करून योग्य ते आदेश पारीत केले आहे. म्हणून मंचाचे आदेश तत्वतः व मुख्यतः मान्य करण्यात येत आहे. तथापि, मंचाच्या आदेशात खालीलप्रमाणे बदल करण्याचे आदेश करण्यात येत आहे.

महावितरणला आदेशीत करण्यात येत आहे की

- डिसेंबर २०२१ ते जून २०२२ त्रैमासीक व मार्च २०२३ त्रैमासीक या कालावधीत आकारलेले / दुरूस्त केलेले वीज देयके ही **६०० युनीट प्रती त्रैमासीक** या सुत्रानुसार आकारून तसेच आदेशापर्यंतच्या कालावधीपर्यंत लागलेले व्याज पुर्णपणे माफ करून वीज देयक सुधारीत करून देण्यात यावी, व अपिलार्थीस त्याप्रमाणे क्रेडीट देण्यात यावे.
- अपिलार्थींची कृषीपंप वीज धोरण २०२० योजने अंर्तगत वीज दुरूस्त सुट ची मागणी फेटाळण्यात येत आहे.
- आदेशाचे अनुपालन अहवाल आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करण्यात यावा.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

१०.	अपिलार्थीने अभिवेदन सादर करताना भरलेली अनामत रक्कम रू.१०,०००/- अपिलार्थीच्या वीज देयकात समायोजीत करण्यात यावी.

११.	सबब, अपिलार्थीचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वंदना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai